# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २३/०२/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा एमपी ढाबा सामोर भदी पिपळा हायवे क्रमांक एन एच ४७ येथे दिनांक २२/०२/२२ चे १९.०० वा. दरम्यान अज्ञात वाहन चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीणे चालवुन एमएच— ३१/डीएफ— ८५२० क्रमांकाच्या मोटरसायकला एमपी ढाबा समोर हायवे क्रमांक ४७ वर मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार ज्ञानेश्वर जनार्दन चिपडे(मृतक), वय २४ वर्षे रा. उमरी वार्ड क्र. ३ याचे डोक्याला जबर मार लागुन मरण पावला. अज्ञात वाहनचालक आपले वाहन घेऊन घटनास्थळावरून पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर बारकुजी वाडी, वय ४८ वर्ष, रा. भदी पिंपळा वार्ड नंबर ३ यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री नासरे मो नं ९९२३१३१५०७ हे करीत आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील मौजा खंडाळा येथे दिनांक १७/०२/२०२२ चे ११.४२ वा. ते दिनांक १८/०२/२०२२ चे १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुखदेव पांडुरंग गुरवे, वय ६७ वर्ष, रा. करंभाड ता.पारशिवनी हे त्यांचे मोबाईल वर फेसबुक बघत असता गाई खरेदी बाबत जाहीरात दिसल्याने व फेसबुकवर खोटी जाहीरात आरोपी नामे— सोनु कुमार चाट याने टाकल्याने त्यांनी ते जाहीरात उघडुन त्यावर मोबाईल फोनवर फोन करून संपर्क केला व दोन गाईचा ५८,०००/— रू. चा खरेदी करण्याची बोलनी झाली. फिर्यादीने वेळोवेळी आरोपीने दिलेल्या दोन बँक खात्यात फोनपे चा वापर करून पहिल्यादा ५,०००/—रू. दुसऱ्यांदा १४,५००/—रू. तिसऱ्यांदा १४,०००/—रू. व चौथ्यांदा ५००/—रू. असे एकुण कि. ३४,०००/—रू. ऑनलाईन पद्धतीने ट्रान्सफर करून दोन गायी न देतो आरोपीने फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(डी) मीहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.नि श्री सोनवणे मो क्र ७०२०५७७४५९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर